॥ अशी पाखरे येती ॥

गायकः सुधीर फडके
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः सुधीर फडके

अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती।
दोन दिसांची रंगत संगत दोन दिसांची नाती ॥ धृ. ॥

चंद्र कोवळा पहिलावहिला
झाडामागे उभा राहीला।
जरा लाजुनी जाय उजळुनी काळोखाच्या राती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती ॥ १ ॥

फुलुन येता फूल बोलले
मी मरणावर हृदय तोलले।
नव्हते नंतर परी निरंतर गंधित झाली माती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती ॥ २ ॥

हात एक तो हळू थरथरला
पाठीवर मायेने फिरला।
देवघरातिल समईमधुनी अजून जळती वाती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती ॥ ३ ॥

कुठे कुणाच्या घडल्या भेटी
गीत एक मोहरले ओठी।
त्या जुळल्या हृदयांची गाथा सुर अजुनही गाती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती ॥ ४ ॥